जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# अहिल्यानगरमध्ये १ व २ ऑगस्ट रोजी हस्तकला बाजार प्रदर्शनाचे आयोजन

नगर - स्थानिक कलाकार, कारागीर, महिला उद्योजिका आणि लघुउद्योजकांना त्यांच्या कलेचे प्रदर्शन व विक्रीसाठी दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सावेडीतील प्रेमदान चौकाजवळील कोहिनूर मॉल येथे १ व २ ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते रात्री ९ या वेळेत हस्तकला बाजार आयोजित करण्यात आला आहे.

या दोन दिवसीय प्रदर्शनात रेझिन आर्ट, मंडला आर्ट, हस्तनिर्मित दागिने, पारंपरिक ज्वेलरी, होम डेकोर, सुगंधी मेणबत्त्या, कस्टमाइज्ड गिफ्ट्स, क्रोशे उत्पादने, लिप्पन आर्ट, स्किनकेअर उत्पादने, फ्रिज मॅग्नेट्स, परफ्यूम, रूम फ्रेशनर्स, सोया मिल्क पनीर आदी विविध प्रकारच्या हस्तनिर्मित आणि स्थानिक उत्पादनांचे २० स्टॉल्स ग्राहकांसाठी उपलब्ध असणार आहेत. या उपक्रमाद्वारे स्थानिक कलाकारांना थेट ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळणार असून, व्होकल फॉर लोकल या संकल्पनेला चालना देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. कोहिनूर मॉलचे संचालक अश्विन गांधी आणि श्वेता गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात येणारा हा उपक्रम हा केवळ व्यावसायिक नसून सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम आहे. कोहिनूर मॉलने आतापर्यंत धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आरोग्य जनजागृती, पर्यावरण संवर्धन तसेच सामाजिक संस्थांच्या विविध उपक्रमांना सातत्याने व्यासपीठ उपलब्ध करून दिले असून, स्थानिक कलाकार, महिला बचत गट आणि नवउद्योजकांना प्रोत्साहन देण्याचे कार्यही सातत्याने केले आहे. समाजोपयोगी उपक्रमांना नेहमीच प्राधान्य देणाऱ्या कोहिनूर मॉलतर्फे यावेळीही स्थानिक कलेला प्रोत्साहन देण्याचा हा प्रयत्न असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने हस्तकला बाजाराला भेट देऊन स्थानिक कलाकारांकडून खरेदी करून त्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९३०९७ ३९९२८ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# जनतेच्या कराच्या पैशातून पगार घेणाऱ्या अधिकाऱ्यांना मोकाट कुत्रे आवरता येत नसतील तर त्यांनी घरी बसावे

## अलतमश जरीवाला यांची महापालिका प्रशासनावर खरमरीत टीका



शहरातील विविध चौकात मोकाट कुत्र्यांची टोळी फिरताना दिसते.

नगर - शहरातील लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिक भटक्या कुत्र्यांच्या दहशतीखाली जगत आहेत. नागरिकांचे प्राण वाचविण्याची जबाबदारी असलेल्या अधिकाऱ्यांना जर त्यांच्या कर्तव्याचे भान नसेल, तर अशा बेजबाबदार अधिकाऱ्यांनी तात्काळ आपल्या खुर्च्या रिकाम्या करून घरी बसावे. जनतेच्या कराच्या पैशावर पगार घेऊन नागरिकांच्या जीवाशी खेळ करण्याचा अधिकार कोणालाही नाही, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)चे अल्पसंख्यांक शहर जिल्हाध्यक्ष अलतमश जरीवाला यांनी महानगरपालिका प्रशासनावर केली.

याबाबत त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, अहिल्यानगर शहरात भटक्या कुत्र्यांचा वाढता उपद्रव आता नागरिकांच्या जीवावर बेतू लागला असून, महानगरपालिका प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे शहरातील नागरिक भयभीत झाले आहेत. शहरातील भटक्या व पिसाळलेल्या कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात आणि दोषी अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करावी. अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)च्या वतीने नागरिकांना सोबत घेऊन महापालिकेविरोधात तीव्र लोकआंदोलन छेडण्यात येईल. या आंदोलनातून उद्भवणाऱ्या परिस्थितीची संपूर्ण जबाबदारी महापालिका प्रशासनाची राहील. आता जनतेचा संयम संपत चालला असून, प्रशासनाने तातडीने जागे व्हावे; अन्यथा जनता रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराही अलतमश जरीवाला यांनी दिला.

### मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्यात ४० जण जखमी

दिल्ली गेट परिसरात अवघ्या साडेतीन वर्षांच्या चिमुकल्यावर भटक्या कुत्र्यांनी जीवघेणा हल्ला केल्याची अत्यंत धक्कादायक घटना घडली. परिसरातील काही धाडसी महिलांनी प्रसंगावधान राखून त्या चिमुकल्याला कुत्र्यांच्या तावडीतून सुखरूप बाहेर काढल्याने त्याचे प्राण वाचले. मात्र, वेळेवर मदत मिळाली नसती तर मोठी दुर्घटना घडली असती. विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वीच शहरात एका पिसाळलेल्या कुत्र्याने तब्बल ४० नागरिकांवर हल्ला करून जखमी केले होते. ही गंभीर घटना ताजी असतानाही अहिल्यानगर महानगरपालिका प्रशासनाने कोणतीही प्रभावी मोहीम राबवली नाही. त्यामुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, अशी टीका जरीवाला यांनी केली.

# अकरा वर्षांपासून दरोड्याच्या गुन्ह्यातील फरार आरोपीसह दोघांना ठोकल्या बेड्या



नगर - दरोड्याच्या गुन्ह्यातील फरार आरोपीसह दोन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक करून संबंधित पोलीस ठाण्यांच्या ताब्यात दिले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

अहिल्यानगर जिल्ह्यात दाखल गुन्ह्यांतील फरार व पाहिजे आरोपींना अटक करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलीस अंमलदार सोमनाथ झांबरे, भिमराज खर्से, अमोल आजबे, मनोज साखरे तसेच चालक काकडे यांचे पथक तयार करून फरार आरोपींच्या शोधासाठी रवाना केले.

२८ जुलै रोजी हे पथक कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीत फरार आरोपींचा शोध घेत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली. त्यानुसार कर्जत पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल असलेल्या दरोड्याच्या गुन्ह्यातील पाहिजे आरोपी रोहिदास दशरथ दराडे (वय ४०, रा. दरवडी, खर्डा, ता. जामखेड) याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान त्याने संबंधित गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. तसेच जामखेड पोलीस स्टेशनमध्ये दाखल गुन्ह्यातील फरार आरोपी इरफान पिरखान पठाण (वय २६, रा. पाटोदा, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर) यालाही पथकाने अटक केली. चौकशीदरम्यान त्यानेही संबंधित गुन्ह्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली.

अटक करण्यात आलेल्या दोन्ही आरोपींना पुढील तपासासाठी अनुक्रमे कर्जत व जामखेड पोलीस ठाण्यांच्या ताब्यात देण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

# जुगार आ अवैध दारू अड्ड्यांवर पोलिसांचे छापे; आरोपींकडून १३ लाख ९७ हजारांचा मुद्देमाल जप्त

नगर - अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने श्रीरामपूर शहरात सुरू असलेल्या अवैध धंद्यांवर छापे टाकत ८ आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल केले. तसेच या कारवाईत आरोपींकडून सुमारे १३ लाख ९७ हजार ८३५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यामध्ये रोख रक्कम, मोबाईल, जुगाराचे साहित्य, वाहने तसेच देशी-विदेशी मद्याच्या बाटल्यांचा समावेश आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे आदेश दिल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड तसेच पोलीस अंमलदार रिचर्ड गायकवाड, शामसुंदर जाधव, भगवान थोरात, रमिझराजा आतार आणि विशाल तनपुरे यांचे विशेष पथक तयार करण्यात आले. या पथकाने श्रीरामपूर शहर व परिसरात माहिती संकलित करून २८ जुलै रोजी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही कारवाई केली.

या कारवाईत महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यानुसार अरुण संजय बोरुडे (वय २८, रा. घरकुल, अक्षय कॉर्नर, श्रीरामपूर), दिपक बाळासाहेब यादव (वय २८, रा. खटकळी रोड, यादववस्ती, श्रीरामपूर) आणि सचिन भैरव नवले (वय ३४, रा. सुभाषवाडी, बेलापूर, ता. श्रीरामपूर) यांच्यावर कारवाई करण्यात आली. या गुन्ह्यात स्वामी परदेशी (रा. बेलापूर, ता. श्रीरामपूर) व अश्पाक जाहगिरदार (रा. वॉर्ड क्र. २, श्रीरामपूर) हे फरार आहेत. या कारवाईत १ लाख ४५ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दुसऱ्या कारवाईत रविंद्र महादेव गायकवाड (वय ३०, रा. संगमनेर रोड, नॉर्दन ब्रँच, श्रीरामपूर) याला ताब्यात घेण्यात आले. तर अश्पाक जाहगिरदार (रा. वॉर्ड क्र. २, श्रीरामपूर) हा फरार झाला. या कारवाईत ७ लाख ३३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच महाराष्ट्र दारूबंदी कायद्याअन्वये नितेश अमरीकलाल कंत्रोड (वय ४३, रा. जय भोले चौक, गोंधवणी रोड, श्रीरामपूर) याच्यावर कारवाई करण्यात आली.

# अहिल्यानगर येथे विशेष न्यायालयाला मान्यता; कर्जतला होणार अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालय

मुंबई - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षस्थानी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत अहिल्यानगर येथे अनन्य विशेष न्यायालय उभारण्यास मंजुरी देण्यात आली असून, कर्जत येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय सुरु करण्यात मान्यता देण्यात आली आहे. या दोन्ही न्यायालयांच्या निर्मितीसाठी आवश्यक निधी, पदस्थापना करण्यासही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.

राज्यात अनुसुचित जाती/जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ खाली सुमारे १७ हजार २३ प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यापैकी अहिल्यानगर येथे १ हजार १४, परभणी येथे ५२६, सोलापूर येथे ५१६, नांदेड येथे ७३५ आणि यवतमाळ येथे ७२३ प्रकरणे प्रलंबित आहेत. वाढत्या प्रलंबित प्रकरणाची संख्या पाहता अहिल्यानगर येथे विशेष न्यायालय मंजूर करण्याचा विचार शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत अहिल्यानगर येथे अनन्य विशेष न्यायालय सुरु करण्यास मंजुरी देण्याचा निर्णय घेण्यात आला. याशिवाय परभणी, सोलापूर, नांदेडसह यवतमाळ येथेही विशेष न्यायालय सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीमधील व्यक्तींना न्याय मिळवून देण्यासाठी ही न्यायालये उपयुक्त ठरणार आहेत. एका अनन्य विशेष न्यायालयाकरिता न्यायाधीशांच्या एका पदासह सहाय्यभूत कर्मचाऱ्यांची सहा अशा एकूण सात नियमित पदे आणि दोन मनुष्यबळाच्या सेवा बाह्य यंत्रणेकडून उपलब्ध करून घेण्यास मान्यता देण्यात आली. यासाठी येणाऱ्या ४ कोटी ५१ लाख रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली.

जिल्ह्यातील कर्जत व जामखेड तालुक्यांतील नागरिकांना न्यायसेवा अधिक सुलभ व जलद उपलब्ध करून देण्यासाठी कर्जत येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या प्रस्तावित न्यायालयासाठी न्यायिक अधिकाऱ्याचे एक पद, शासकीय अभियोक्ता कार्यालयासह सहाय्यभूत कर्मचाऱ्यांची २२ पदे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच आवश्यक कामकाजासाठी बाह्य यंत्रणेद्वारे सात मनुष्यबळांची सेवा घेण्यासही मान्यता देण्यात आली आहे. प्रस्तावित न्यायालय व शासकीय अभियोक्ता कार्यालयासाठी ३ कोटी ३० लाख रूपये खर्चास मंजुरी दिली आहे.

या निर्णयामुळे कर्जत व जामखेड तालुक्यांतील नागरिकांना जिल्हा व सत्र न्यायालयीन कामकाजासाठी दूरवर जावे लागणार नाही. स्थानिक पातळीवर न्यायदानाची सुविधा उपलब्ध झाल्याने न्यायप्रविष्टांचा वेळ, खर्च आणि श्रम वाचतील. तसेच न्यायव्यवस्थेची कार्यक्षमता वाढून नागरिकांना अधिक वेगवान, सुलभ आणि प्रभावी न्यायसेवा मिळण्यास मदत होणार आहे.

# अल्पसंख्याक शिष्यवृत्ती निधीतील कपात मागे घ्या; प्रलंबित योजना तातडीने मार्गी लावण्याची मागणी



शिष्यवृत्तीतील निधी कपात मागे घेण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देताना अथर खान, समीर पठाण, अजहर शेख, परवेज शेख, फारूक रंगरेज आदी.

नगर - अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती, शुल्क प्रतिपूर्ती तसेच लघुउद्योजकांसाठीच्या योजनांना पुरेसा निधी उपलब्ध करून द्यावा, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब पाटील यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती योजनेसाठी सुमारे २०० कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता असताना केवळ ६० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच अतिरिक्त ९० कोटी रुपयांच्या पुरवणी निधीची मागणीही नाकारण्यात आल्याने मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, पारशी आणि जैन समाजातील उच्च व व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व शुल्क प्रतिपूर्तीची रक्कम वेळेवर मिळत नसल्याने त्यांना आर्थिक व मानसिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

केंद्र शासनाने बंद केलेले मौलाना आझाद एज्युकेशन फाऊंडेशन पुन्हा सुरू करण्यासाठी राज्य शासनाने केंद्राकडे पाठपुरावा करावा, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाला आवश्यक निधी उपलब्ध करून देत लघुउद्योजकांच्या प्रलंबित कर्ज अर्जांचा तातडीने निपटारा करावा, अशी मागणीही करण्यात आली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष अथर खान यांनी अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थी व लघुउद्योजकांना न्याय मिळण्यासाठी शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी केली. शिष्यवृत्ती, शुल्क प्रतिपूर्ती आणि स्वयंरोजगार योजनांसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी जिल्हाध्यक्ष अथर खान, जिल्हा कार्याध्यक्ष समीर पठाण, शहर कार्याध्यक्ष अजहर शेख, समन्वयक परवेज शेख, फारूक रंगरेज, रियाज कुरेशी, चंद्रकांत उजागरे, बब्बू कुरेशी, बशीर शेख आणि फैयाज तांबोळी उपस्थित होते.

# प्लास्टिक वापरणाऱ्या दुकानदारांवर अहिल्यानगर मनपाची कारवाई

## ५५ हजारांचा दंड, ३६५ किलो प्लास्टिक जप्त



नगर - महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांच्या आदेशानुसार महापालिकेच्या पथकाने सिंगल युज प्लास्टिकचा वापर करणाऱ्या दुकानदारांवर दंडात्मक कारवाईसह प्लास्टिक जप्तीची मोहीम राबवली. महापालिकेच्या पथकाने विविध भागांत धाडी टाकून कारवाई करत असून, गेल्या महिनाभरात ५५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला असून तब्बल ३६५ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे.

यासोबतच शहरात रस्त्यावर कचरा टाकणाऱ्या नागरिकांवर तसेच महापालिकेच्या परवानगीशिवाय रस्ते खोदून सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणाऱ्यांवरही दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. शहर स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक ठेवण्यासाठी महापालिकेने ही मोहीम अधिक तीव्र केली असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर पुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

शासनाने सिंगल युज प्लास्टिकवर बंदी घालूनही काही दुकानदार, व्यापारी आणि भाजी विक्रेते सर्रासपणे प्लास्टिक पिशव्यांचा वापर करत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे महापालिकेच्या स्वच्छता विभागाने विशेष तपासणी मोहीम हाती घेत संबंधितांकडून दंड वसूल करून मोठ्या प्रमाणात प्लास्टिक जप्त केले. ही कारवाई मुख्य स्वच्छता निरीक्षक प्रशांत रामदीन स्वच्छता निरीक्षक बाळासाहेब विधाते, सुरेश वाघ, ऋषिकेश भालेराव, ऋषिकेश वाल्मीक, संदीप चव्हाण, प्रसाद उमाप, प्रशांत चांदणे, राजेंद्र सामन आणि शुभम उपलंची यांनी केली.

शासनाचा प्लास्टिक बंदीचा आदेश असून प्लास्टिकमुक्त शहर घडविण्यासाठी सर्वप्रथम शहरातील व्यावसायिक, व्यापारी, दुकानदार आणि भाजी विक्रेत्यांनी पुढाकार घेत प्लास्टिकचा वापर पूर्णपणे बंद करून कापडी पिशव्यांचा वापर करावा, असे आवाहन महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.

# भिमराव गायकवाड यांचे अल्प आजाराने निधन



नगर - येथील रहिवासी जिल्हा परिषदेतील प्राथमिकचे सेवानिवृत्त ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी भिमराव दगडू गायकवाड (वय ७७) यांचे २२ जुलै रोजी नाशिक येथे अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर नाशिक येथील रामवाडी पंचवटी अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या मागे पत्नी, २ मुली, २ मुले, सुना, १ बहिण असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई; ३ लाख ११ हजार २५० रुपयांचा दंड केला वसूल



नगर - शहरात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या एकूण ४८६ वाहनांवर मोटर वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत वाहन चालकांकडून एकूण ३ लाख १९ हजार २५० रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. ही कारवाई २८ जुलै रोजी सायंकाळी करण्यात आली.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली ही धडक मोहीम राबवण्यात आली. यामध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे, कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमखु, तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य, शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक महेश पाटील, भिंगार पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

अहिल्यानगर शहर हद्दीत अचानक नाकाबंदी करून वाहतूक नियमभंग करणाऱ्या वाहन चालकांवर ही कारवाई करण्यात आली. यामध्ये फॅन्सी नंबर प्लेट व नंबर प्लेट नसलेले, लायसन्स सोबत न बाळगणे, ट्रिपल सीट वाहन चालवणे, काळी काच असलेले, मॉडिफाय सायलेन्सर, ड्रंक अँड ड्राईव्ह (मद्यप्राशन करून वाहन चालवणे), अल्पवयीन मुलांनी वाहन चालवणे, एचएसआरपी नंबर प्लेट नसलेले, मोबाईल फोनवर बोलणारे आणि सिट बेल्ट न लावलेले वाहन चालक यांचा समावेश होता.

अहिल्यानगर शहरामध्ये यापुढे देखील फॅन्सी नंबर प्लेट व नंबर प्लेट न लावणे, लायसन्स सोबत न बाळगणे, ट्रिपल सीट वाहन चालवणे, काळी काच असलेले, बुलेट फटाका सायलेन्सर, मद्यप्राशन करून वाहन चालवणे यांविरोधात कारवाई सुरु राहणार आहे. तसेच अल्पवयीन मुलांनी वाहन चालवू नये, असे आवाहन टिपरसे यांनी केले आहे. तसेच, शहरामध्ये वाहतूक नियमभंग करणाऱ्या वाहन चालकांविरुद्ध मोटर वाहन कायद्यान्वये कायदेशीर कठोर कारवाई करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

# मनपाचा क्यूआर कोड आधारित कचरा संकलन प्रकल्पात घोटाळा

## ६ हजार ७६० मालमत्तांवर क्यूआर कोड लावल्याचा दावा; प्रणाली सुरू नसताना दिला पूर्णत्वाचा अहवाल

नगर - महानगरपालिकेच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या क्यूआर कोड आधारित कचरा संकलन व देखरेख प्रकल्पामध्ये गंभीर अनियमितता समोर आली आहे. महापालिकेने शहरातील ६ हजार ७६० मालमत्तांवर प्रणाली बसवून ३२ हजार १६० क्यूआर कोड स्टिकर्स लावण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र, प्रत्यक्षात शहरात क्यूआर कोड आधारित कचरा संकलन व्यवस्था कार्यान्वित नसल्याचा, नागरिकांना कोणतीही सुविधा उपलब्ध नसल्याचा आणि प्रणाली सुरू असल्याचा कोणताही ठोस पुरावा नसल्याचे सांगण्यात येते.

याबाबत पतित पावन संघटनेने नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांकडे तक्रार केली असून, या घोटाळ्याची सविस्तर चौकशी करण्याची मागणी केली आहे. याबाबत संघटनेने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, प्रकल्पाच्या नावाखाली शासनाची दिशाभूल, माहिती अधिकार कायद्याचे उल्लंघन आणि निधीच्या वापराबाबत संशय व्यक्त करत संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. पतित पावन संघटनेचे जिल्हाध्यक्ष गोरक्षनाथ चंद्रकांत सोनवणे, शहराध्यक्ष नितीन सुराणा, शहर संघटक संदीप जगताप, शहर उपाध्यक्ष अमोल दरंदले, स्वामी दौंडकर तसेच इतर पदाधिकाऱ्यांच्या वतीने हे निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, माहिती अधिकार कायद्यांतर्गत मागविलेली माहिती महानगरपालिकेकडून वारंवार नाकारण्यात आली किंवा अपूर्ण स्वरूपात देण्यात आली. प्रथम अपील प्राधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही माहिती उपलब्ध करून देण्यात आली नाही. त्यामुळे महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्यात आले आहे.

दरम्यान, आयटीआय लिमिटेड (भारत सरकार उपक्रम) यांच्या अहवालात प्रकल्प पूर्ण झाल्याचा दावा करण्यात आला असून, ६ हजार ७६० मालमत्तांवर प्रणाली बसवून ३२ हजार १६० क्यूआर कोड स्टिकर्स लावण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र, प्रत्यक्षात शहरात क्यूआर कोड आधारित कचरा संकलन व्यवस्था कार्यान्वित नसल्याचा, नागरिकांना कोणतीही सुविधा उपलब्ध नसल्याचा आणि प्रणाली सुरू असल्याचा कोणताही ठोस पुरावा नसल्याचा दावा संघटनेने केला आहे. संघटनेने उपस्थित केलेल्या प्रश्नांमध्ये प्रकल्प प्रत्यक्षात पूर्ण झाला का, क्यूआर कोड नेमके कोणत्या ठिकाणी बसविण्यात आले, प्रणाली सुरू नसताना पूर्णत्वाचा अहवाल कसा देण्यात आला, माहिती का लपविण्यात आली आणि शासनाचा निधी नेमका कशावर खर्च करण्यात आला, यांचा समावेश आहे.

निवेदनात प्रकल्पाची प्रत्यक्ष स्थळ पडताळणी करून काम आदेश, करारनामा, बिले, देयके, पूर्णत्व प्रमाणपत्र, तपासणी अहवाल तसेच संबंधित पत्रव्यवहाराची सखोल चौकशी करावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच माहिती अधिकार कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

पतित पावन संघटनेने प्रशासनाला सात दिवसांचा अल्टिमेटम देत चौकशी सुरू करून त्याबाबत लेखी माहिती द्यावी, अन्यथा नागरिकांच्या हितासाठी लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन, धरणे व निदर्शने करण्यात येतील, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

# ब्रम्हचैतन्य गोंदवलेकर महाराजांच्या गुरूगादीचे मठाधिपती माधवानंद स्वामी



दोनशे २५ वर्षांची पवित्र परंपरा असलेल्या श्री चिन्मयमूर्ती संस्था, उमरखेड या संस्थानचे मठाधिपती प. पू. माधवानंद गुरू वामनानंद स्वामी यांचा चतुर्मास ऐतिहासिक श्रीक्षेत्र पैठण येथे २८ जुलै ते ३० ऑगस्ट २६ अखेर माहेश्वरी भक्ती निवास होत आहे. दिनांक २९ जुलै रोजी गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने राज्यातील अनेक भक्तजन गुरूंच्या दर्शनासाठी श्रीक्षेत्र पैठण येथे लाखोच्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. यानिमित्ताने सद्गुरूंच्या कार्याचा अल्प परिचय.

सातारा येथील ब्रम्हचैतन्य गोंदवलेकर महाराज यांचे सद्गुरू असलेल्या तुकामाई यांचे कार्य अविरतपणे पुढे चालू ठेवणारे यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड येथील चिन्मयमूर्ती संस्थानचे मठाधिपती सद्गुरू प. पू. माधवानंद महाराज आजच्या आधुनिक वैज्ञानिक युगातही आपल्या शिष्यांना सन्मार्ग दाखवणारे एक महान योगी पुरुष आहेत. मराठवाड्यातील सर्व समाजबांधवांचे एक आदर्श गुरूस्थान असलेल्या चिन्मयमूर्ती संस्थानचे मठाधिपती प. पू. माधवानंद महाराज यांनी देवस्थानच्या या पवित्र गादीवर विराजमान झाल्यानंतर आपल्या सर्व शिष्यांना एकत्र करून येळेगाव आणि उमरखेड येथील संस्थानच्या कार्याची महती, पावित्र्य व त्यांचे कार्य आदर्शवत करण्याचा मोठा संकल्प करून त्याचा विस्तार केला. ब्राम्हण आणि ब्राम्हणेतर समाजाचे अपार श्रध्दास्थान असलेले या गुरूगादीचा इतिहास पवित्र आहे.

या संस्थानचे स्वामी चिन्मयानंद यांचा जन्म शके १६७७ मध्ये झाला. त्याकाळी ख्रिस्त-मुगल मुस्लिम लोकांनी हिंदू धर्मावर अन्याय केला. ख्रिस्त लोक धर्म प्रचारासाठी हिंदूंना आमिषे दाखवत असत. हिंदू धर्माचे संघटन करण्यासाठी, धर्म जागृतीसाठी त्यांनी चिन्मय संस्थानची निर्मिती करून समाजात जागृती केली. दीन-दुबळ्यांची सेवा करून त्यांनी आपले कार्य सतत चालू ठेवले.

चिन्मय संस्थानच्या कार्याचा इतिहास आगळावेगळा आहे. संन्यासी आश्रम घेतलेल्यांची ही गुरूगादी आहे. थोर तपस्वी, त्यागी आणि ज्ञानाचे भांडार असलेल्या शिवभक्त स्वामी सहजानंद महाराज यांच्या हातावर १०७ वेळा भगवान शंकराची मूर्ती प्रगट झाली होती आणि १०८ विश्वंभराचे लिंगही प्रकट झाले होते. आजही विश्वंभराच्या लिंगाचे दर्शन दररोज भक्तांना दिले जात आहे. सुमारे एकशे पन्नास वर्षी प्रकट झालेल्या लिंगाचे पावित्र्य संस्थानकडून जपले जात आहे. विश्वंभर पूजन महारुद्राभिषेक नामस्मरण गुरुसेवा अन्नदान आदी कार्य दैनंदिन याद्वारे होत ओत. संस्थानचा शिवरात्र महोत्सव आणि चातुर्मास हे हे दोन कार्यक्रम मोठ्या भक्तीभावाने, श्रध्देने मोठ्या प्रमाणात साजरे केले जात असतात. दरवर्षी भक्तांच्या श्रध्दापूर्ण मागणीप्रमाणे कार्यक्रम राज्यात होत असतात. राज्यातून अनेक गुरुभक्तांची

मागणीही या दोन्ही कार्यक्रमांसाठी विविध भागांमधून होत असते. महाशिवरात्री महोत्सवाकरिता सुमारे १० हजारापेक्षा जास्त भाविक कार्यक्रमासाठी उपस्थित रहात असतात तर चातुर्मास काळात ५ लाखापेक्षा जास्त भाविकांची संख्या असते. हे दोन्हीही उत्सव भक्तांच्या डोळ्याचे पारणे फिटणारे असे अलौकिक असतात. दरवर्षी साजरे होणारे हे सर्वच कार्यक्रम प्रत्येकवर्षीच्या धार्मिक कार्याचा उच्चांक मोडीत काढत साजरे केले जातात.

प. पू. माधवानंद स्वामी यांची संस्थानच्या मठाधिपती नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात दौरा करून गुरूभक्तांशी संवाद साधला.

### कीर्तन, प्रवचन याद्वारे भक्तांना संबोधित

न करता सहज आपलेपणाने प्रत्येकाशी संवाद साधून त्यांना हितोपदेश सांगत सरळ भाषेत सर्वांना मार्गदर्शन करण्याचे कार्य चालू ठेवले. लहान-मोठा, गरीब-श्रीमंत, जातीभेद न ठेवता सर्वांशी एकसारखे नाते जपत त्यांनी सर्वांना आपलेसे करून घेतले. शिष्यांच्या सुखदुःखात त्यांना मार्गदर्शन देऊन सन्मार्ग दाखवण्याचे त्यांचे कार्य अविरत चालू आहे. निःस्वार्थ केलेली सेवा याची दखल परमेश्वर घेतो. भगवंतावर श्रध्दा ठेवा, समाजसेवा करताना ती मनोभावे करावी, असे त्यांचे सर्वांना सांगणे असते. अखंड २० वर्षे एक सेवक म्हणून काम करत असलेले पूर्वाश्रमीचे सुधाकर मनोहरपंत जोशी असलेले प. पू. माधवानंद महाराज म्हणजे एक मोठे युगपुरुष आहेत. इ. स. १९६६ पासून चिन्मयमूर्ती संस्थानमध्ये मोठ्या भक्तीभावाने त्यांनी संस्थानची सेवा केली.

२० वर्षांच्या अखंड सेवेत असताना त्यांनी आपल्या व्यवहारिक आणि संसारिक गोष्टींच्या त्याग करून गुरूसेवा मनोभावे करून आपली सेवा गुरूचरणी अर्पण केली. आपण करत असलेल्या सेवेचे फळ आपणास या संस्थानचे सर्वोच्च मिळेल त्यांच्या ध्यानीमनीसुध्दा नव्हते. संस्थानचे मठाधिपती वामनानंद महाराज यांनी दखल घेऊन त्यांना आपणाला नंतर संस्थानचे मठाधिपती नियुक्ती करावी, असे इच्छापत्र लिहून ठेवले होते आणि ते अंतिम क्षणापर्यंत कोणासही माहिती नव्हते. गुरू वामनानंद महाराज यांचेवर असलेली परमश्रध्दा, निस्सीम भक्ती, संस्थानमध्ये केलेली अखंड सेवा आणि आलेल्या सर्व भक्तांवर असलेला स्नेह त्यांनी जागवला म्हणून संस्थानचे दहावे मठाधिपती होण्याचा बहुमान त्यांना प्राप्त झाला. सन २००० सालापासून प. पू. माधवानंद महाराज संस्थानचे मठाधिपती म्हणून कार्य करत आहेत. सर्वच भक्तांना सहज भेटणारे आणि संवाद साधणारे सद्गुरू त्यांच्या रुपाने आपल्या सर्वांना लाभले आहे हे आपले सर्वांचे भाग्य आहे.

आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये गुरूंना अनन्यसाधारण महत्त्व आहे. गुरुचा महिमा हा अगाध आहे. चिन्मय संस्थानच्या मठाधिपतींची गादी ही संन्याशाची आहे. त्या कारणाने या गादीवरील गुरूचे महत्त्व तेजोमय आहे. संन्यास म्हणजे काय? सर्वच गोष्टींचा त्याग करणे. धन, दौलत, आप्त-स्वकिय, संसार याचा त्याग करून नवीन जगणे होय. या सर्वांचा त्याग करून नवीन जगणे होय. या सर्वाचा त्याग करून नवीन जगणारे हे त्यागीपुरुष आहेत. त्याचा चातुर्मास श्रीक्षेत्र पैठण येथे होत आहे.



रमेश देशपांडे
९४२३७९३२२६

# प्रेरणादायी अक्षरधन

## गुरु एक जगी त्राता

"मुसाफिर" वाचनीय मननीय अक्षर धन
संकलन: दिशान फिचर्स




महाकवी कालिदास संस्कृतमधील एक मोठा नाटककार. त्याने लिहिले आहे. मालविकाग्निमित्रम नावाचे नाटक. ते आहे मार्ग या प्रकाराचे नाटक. मार्ग हा एक संस्कृतातला नाट्यप्रकार अगदी वेगळा, कालिदासने त्यात दाखवलाय दोन शिक्षकांचा झगडा त्या शिक्षकांना मिळाली राजाची नोकरी. त्यांची वृत्ती बनली बेफिकीर. पगारांची हमी, मग करायची कामात कमी। दोन हजार वर्षांपूर्वीचा हा मास्तर। पण कालिदासची प्रतिभा किती लोकोत्तर? एकदम जाणवते, की हा तर आजच्याच मास्तराचा स्टर, त्या नाटकातला एक मास्तर म्हणतो.

लब्धास्पदो स्मीति विवादभीरोः तितिक्षमाणस्य परेण निन्दाम्। तं ज्ञानपण्यं वणिजं वदन्ति।। दोघांपैकी कोणता शिक्षक चांगला? मग लावा दोघाचेही ज्ञान कसाला. ठरवा श्रेष्ठ एकाला. पण ही भानगड हवीच कशाला? त्यातला एक शिक्षक म्हणाला. मिळाली आहे. आता शिक्षकांची जागा. आता नोकरासारखे वागा, कशाला द्यायची आपल्या ज्ञानाची परीक्षा? तेवढ्यासाठी वाचायचे, अभ्यासाला लागायचे, ही तर महान शिक्षा. लोकांना करु देत ना निंदा. आपला बरा स्वहिताचा धंदा. पण मग लोक काय म्हणतील, या शिक्षकाची वृत्ती बाजारी। हा तर शिक्षण क्षेत्रातला व्यापारी। विद्या विकून पोट भरी. वर्गात कशाला शिकवायचे? घरी भरवलेल्या वर्गात या म्हणायचे. त्यासाठी प्रचंड शुल्क आकारायचे. नको नको असे करणे नको. लोकांचा क्षोभ होईल असे वर्तन नको. शिक्षक हा गुरु अज्ञानसागर पार करणारे तारु. तोच लागला वाममार्ग धरु तर जग म्हणेल आता काय करु?

म्हणोनीशिक्षकांनीजाणावे. गुरुमहिमा आठवावे. संत ज्ञानेश्वर माऊली म्हणतात. होय अदृष्ट आपैते। तै वालूची रत्ने परते। उजू आयुष्य तै मारिते। लोभुकरी।। तयापरी श्रीगुरु। करिती जे अंगिकार। ते होउनि ठाके संसार। मोक्षमय आधवा।। गुरु म्हणजे समदभाग्य. गुरुने शिकवले. त्यामुळे असे सामर्थ्य आले की, वाळूच्या कणांचेही शिष्यांनी रत्नात रुपांतर केले. गुरु म्हणजे आत्मविश्वास. मग कोण रोखेल तुमचा श्वास? आला कुणी मारायला, तर पालटेल वृत्ती त्याची आणि लागेल तो तुमच्यावर प्रेम करायला. हे आहे गुरुकृपेचे बळ. फक्त गुरुने तुम्हाला स्वीकारावे शिष्य म्हणून. मग या जीवनात कुठले उरणार दैन्य, दुःख व दारिद्र्य त्रिविध तापातून मुक्त व्हायला शिष्य होईल पात्र. एक होता व्यापारी. दुरदेशी जाऊन धंदा करी. त्यासाठी त्याला नावेतून सदैव यावे जावे लागे. त्याच्या गुरुने त्याला एक सल्ला दिला. नेहमी रिकामे पिंप नावेत असू दे. कधी नाव उलटली तर ते पिंप पाठीला बांधून तु समुद्रात पोहू शकशील. व्यापारी तसे करु लागला. पण त्याचे कधी काम पडले नाही. प्रवासात कधी तसे संकट आले नाही. मग गुरुच्या उपदेशाचे महत्व तेवढे वाटले नाही.

एका प्रवासात परदेशी खूप धंदा झाला. हिरेमाणकांचा व्यवसाय फळला. स्वस्त भावात खूप हिरे मिळाले. त्याने ते सगळे खरेदीले. आपल्या देशात ते विकून खूप धन मिळवायचा बेत त्याने आखला. पण हे एवढे हिरे नावेत उघडपणे कसे न्यायचे? तो मनाशी हसला. गुरु उगीचच भिववतात मला नसत्या संकटाला.

तो परतला. समुद्रात तुफान उठले. नाव उलटायला लागली. गुरुच्या उपदेशाची आठवण झाली. जीव वाचवायला रिकामा पिंप. पाठीला बांधायची सुचना स्मरली. पण हाय। आता पिंप रिकामे कुठे? त्यात हिरे भरुन त्यांचे तोंड बंद केले. जड पिंप कसे पाठीला बांधणार? त्याचे तोंड फोडून हिरे फेकायला तरी कसे जमणार? वेळ कुठे तेवढा? नाव उलटली, हिरेली गेले व्यापाऱ्याचे प्राणही गेले।

- किशोर गांधी

# अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनानिमित्त बोधचिन्ह स्पर्धेचे आयोजन

नगर - महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे व समर्थ युवा फाउंडेशन पुणे महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने १०० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुणे येथे संपन्न होणार आहे. या संमेलनाच्या निमित्ताने संमेलनाचे बोधचिन्ह बनवा स्पर्धा संपूर्ण देशभरात आयोजित केली जात आहे. या स्पर्धेमध्ये सर्व नागरिक, कलाकार, चित्रकार, विद्यार्थी, व्यावसायिक डिझायनर आदी सर्वजण या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात. ही स्पर्धा सर्वांसाठी खुली आहे. या स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन मसापचे अध्यक्ष योगेश सोमण, प्रमुख कार्यवाह स्वाती महाळंक, कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर यांनी केले आहे.

शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनानिमित्त आयोजित केलेल्या या बोधचिन्ह स्पर्धेमध्ये संमेलनाचे बोधचिन्ह तयार करताना, त्या बोधचिन्ह मध्ये पुढील बाबी असाव्यात - पुणे शहराचा ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा, मराठी साहित्याची समृद्ध परंपरा आणि अभिजात मराठी भाषेची वैश्विक ओळख, महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख, आधुनिकता व भविष्याचा वेध, तसेच संमेलनाचे शंभरावे वर्ष, (शताब्दी) ठळकपणे प्रतिबिंबित झालेले असावे. बोधचिन्ह हे रंगीत असावे. त्याचा आकार मध्यम स्वरूपाचा असावा. विशेष म्हणजे तयार करण्यात येणारे बोधचिन्ह हे पूर्णपणे मूळ स्व. कलाकृती असली पाहिजे ते कोणत्याही विद्यमान डिझाईनची प्रत किंवा कॉपीराईटचे उल्लंघन करणारे नसावे याची सर्वांनी नोंद घ्यावी. तसेच ते पीडीएफ व जेपीजी स्वरूपातही बनवावे.

बोधचिन्ह तयार करून त्या बोधचिन्हां मध्ये आपण काय प्रतिबिंबित केले आहे. त्याविषयी मराठी भाषेत १०० ते १५० शब्दात स्वतंत्र माहिती जोडणे अनिवार्य आहे. परीक्षकांचा व आयोजन समितीचा निर्णय अंतिम असून, तो सर्व स्पर्धकांना बंधनकारक राहील. बोधचिन्हाच्या कागदाच्या मागील बाजूला स्पर्धकाने आपले संपूर्ण नाव, संपूर्ण पत्ता संपर्क क्रमांक, ई-मेल आयडी व संकल्पना स्पष्टीकरण जोडणे महत्त्वाचे आहे.

बोधचिन्ह तयार करून ते २० ऑगस्ट २०२६ पर्यंत उदय मेडिकल, एम.जी रोड, कापड बाजार, अहिल्यानगर येथे समक्ष जमा करावे. विजेत्या स्पर्धकाला ५१ हजार रुपयांचे रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन यथोचित गौरविण्यात येणार आहे. तसेच स्पर्धेत सहभागी सर्वांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र साहित्य परिषदेचे विभागीय कार्यवाह व जिल्हा प्रमुख जयंत येलुलकर, प्रा. गणेश भगत सांगितले. माहितीसाठी ९६०७३९५१७३ व ९४९४०९८८६ या वर संपर्क साधण्याचे आवाहन संयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

# फिरोदिया शिवाजियन्स आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत गोलांचा थरार; 'सेक्रेड हार्ट'ची दमदार कामगिरी

### अंशुमन विधाते याचा गोलचा चौकार; रोमांचक लढतींनी फुटबॉलप्रेमींना खिळवून ठेवले



फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल स्पर्धेतील एक रोमांचक क्षण.

नगर - फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी आयोजित आठव्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत मंगळवारी (२८ जुलै) विविध वयोगटांतील अत्यंत चुरशीचे आणि रोमांचक सामने रंगले. अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या या सामन्यांमध्ये खेळाडूंनी उत्कृष्ट, वेगवान आक्रमणे आणि प्रभावी बचावाचे दर्शन घडविले. काही सामने अखेरपर्यंत अटीतटीचे झाले, तर काही सामन्यांत विजेत्या संघांनी एकतर्फी वर्चस्व गाजवत दमदार विजयांची नोंद केली.

१६ वर्षांखालील मुलींच्या गटात श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल आणि आर्मी एमआयसी अँड एस यांच्यात रंगलेल्या सामन्यात श्री साई इंग्लिश मीडियम स्कूलने १-० अशा फरकाने विजय मिळवला. सामन्याच्या ३६व्या मिनिटाला पूर्वा मालवे हिने केलेला एकमेव गोल निर्णायक ठरला. श्री साईच्या बचावफळीने आर्मी संघाला एकही गोल करण्याची संधी न देता शानदार बचाव केला आणि विजयावर शिक्कामोर्तब केले.

१६ वर्षांखालील मुलांच्या गटात श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल आणि आर्मी एमआयसी ॲण्ड एस यांच्यातील सामना अत्यंत चुरशीचा झाला. दोन्ही संघांनी वेगवान खेळ आणि आक्रमक रणनीती अवलंबली. मात्र, दोन्ही बाजूंच्या बचावफळीने भक्कम कामगिरी केल्याने कोणत्याही संघाला गोल करता आला नाही. परिणामी हा सामना ०-० गोलने बरोबरीत संपला.

१४ वर्षांखालील मुलांच्या गटात आर्मी एमआयसी ॲण्ड एसने श्री साई इंग्लिश मीडियम स्कूलवर २-० असा प्रभावी विजय मिळवला. आर्मी संघाकडून राजवीर याने २८व्या मिनिटाला गोल करून संघाचे खाते उघडले. त्यानंतर ३२व्या मिनिटाला जायन शेख याने आणखी एक गोल करत आघाडी दुप्पट केली. उत्कृष्ट बचाव आणि आक्रमक खेळाच्या जोरावर आर्मी संघाने सामना सहज आपल्या नावावर केला.

याच गटातील पोदार इंटरनॅशनल स्कूल आणि ऊर्जा गुरुकुल यांच्यातील सामन्यात पोदार इंटरनॅशनल स्कूलने २-० असा विजय मिळवला. पोदारकडून विराज देशमुख याने १५व्या मिनिटाला पहिला गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर साई जाधव याने ४५ व्या मिनिटाला दुसरा गोल करत विजय निश्चित केला. ऊर्जा गुरुकुलला मात्र संपूर्ण सामन्यात गोल करता आला नाही.

दुपारच्या सत्रात १२ वर्षांखालील मुलांच्या गटात ओएसिस इंग्लिश मीडियम स्कूलने सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंटवर ३-० असा दणदणीत विजय मिळवला. ओएसिसचा आर्यन पंडित हा सामन्याचा नायक ठरला. त्याने ६ व्या आणि ११ व्या मिनिटाला सलग दोन गोल करत संघाला भक्कम आघाडी मिळवून दिली. त्यानंतर आदित्य सिंग याने ३८ व्या मिनिटाला आणखी एक गोल करत विजयावर शिक्कामोर्तब केले.

१४ वर्षांखालील मुलांच्या गटात मात्र सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंटने पुनरागमन करत ओएसिस इंग्लिश मीडियम स्कूलवर २-० असा विजय मिळवला. सेक्रेड हार्टकडून स्तवन याने ३२ व्या मिनिटाला तर आनंद शिंदे याने ३७ व्या मिनिटाला गोल करत संघाला महत्त्वाचा विजय मिळवून दिला.

दिवसातील सर्वाधिक लक्षवेधी सामना १६ वर्षांखालील मुलांच्या गटात सेक्रेडहार्ट कॉन्व्हेंट आणि ओॲसिस इंग्लिश मीडियम स्कूल यांच्यात झाला. या सामन्यात सेक्रेडहार्ट कॉन्व्हेंटने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत तब्बल ६-० अशा फरकाने एकतर्फी विजय मिळवला. ओॲसिसच्या बचावफळीवर सतत दबाव निर्माण करत सेक्रेडहार्टच्या खेळाडूंनी गोलांचा अक्षरशः पाऊस पाडला.

या सामन्यात अंशुमन विधाते हा स्टार खेळाडू ठरला. त्याने एकूण चार गोल करत प्रतिस्पर्धी संघाच्या बचावफळीला अक्षरशः हैराण केले. त्याने ६ व्या, २८ व्या, ४५ व्या आणि ५६ व्या मिनिटाला गोल नोंदवले. तर अली मिर्झा याने ४७ व्या मिनिटाला एक गोल करत संघाच्या विजयात मोलाची भर घातली. सेक्रेडहार्टच्या आक्रमक खेळीपुढे ओॲसिस संघ पूर्णपणे निष्प्रभ ठरला आणि त्यांना एकही गोल करता आला नाही.



लिटिल फ्लॉवर प्री स्कूलमध्ये गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात आला.

# लिटिल फ्लॉवर प्री स्कूलमध्ये गुरुपौर्णिमा उत्सव साजरा

नगर - भारतीय संस्कृतीत गुरुला अतिशय महत्व आहे. जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक ज्ञानाची शिदोरी आणि संस्कार गुरुकडून शिष्याला मिळते. अशा गुरुप्रती कायम कृतज्ञ रहायला हवे असा संदेश देत लिटिल फ्लॉवर प्री स्कूलच्या इमारत कंपनी, सारसनगर धर्माधिकारी मळा व नवले नगर या चारही शाखांमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.

गुरु पौर्णिमेनिमित्त लिटिल फ्लॉवर प्री स्कूलध्ये चिमुरड्यांनी विविध धर्माच्या धर्मगुरुंची वेशभूषा परिधान करून नाटिका, गाणे, पौराणिक कथा, संगीत नृत्य असे कलाविष्कार सादर केले. महर्षी व्यास, महाभारतातील एकलव्य व गुरु द्रोणाचार्य या गुरुशिष्याचे नाते, जैन धर्मातील गुरु व नवकार महामंत्र तसेच अन्य धर्मातील गुरुंविषयी कार्यक्रम सादर करण्यात आले.

संचालिका मनिषा बोगावत म्हणाल्या, गुरु पौर्णिमा हा गुरुप्रती निष्ठा व कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. शाळेत मुलांच्या मनावर लहान वयापासूनच जीवनातील गुरुच महत्वपूर्ण स्थानाविषयी मार्गदर्शन केले जाते. मुलांनी गुरुपौर्णिमा साजरी करताना अतिशय उद्बोधक कार्यक्रम सादर केले. गुरु साक्षात परब्रम्ह या विषयावर गायन सादर करण्यात आले. गुरु आपल्याला जे ज्ञान देतात ते आपल्या आयुष्याला दिशा देणारे असते. गुरुच्या मार्गदर्शनामुळे शिष्य कोणत्याही अडचणीचा यशस्वीपणे सामना करून सकारात्मक ऊर्जा मिळवू शकतो, असा संदेश यानिमित्त देण्यात आला.

विशाल बोगावत यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी चारही शाळांतील शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

# शिष्यवृत्ती परीक्षेत काकासाहेब म्हस्के विद्यालयाची उज्ज्वल कामगिरी

### स्वरा भापकर, प्रांजल चेमटे व सुमित खेडकर यांचे नेत्रदीपक यश



नगर - जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित काकासाहेब म्हस्के विद्यालयातील विद्यार्थ्यांनी इयत्ता चौथी व सातवी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचा विद्यालयाच्या वतीने गुलाबपुष्प देऊन कौतुक व गुणगौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक क्षेत्रातील लौकिकात आणखी भर पडली असून शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शिष्यवृत्ती परीक्षेत स्वरा भापकर, प्रांजल चेमटे आणि सुमित खेडकर या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक कामगिरी करत पात्रता मिळविली. अत्यंत स्पर्धात्मक वातावरणात झालेल्या या परीक्षेत विद्यार्थ्यांनी घेतलेली मेहनत, सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे प्रोत्साहन यामुळे त्यांना हे यश मिळाले. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत विद्यालयाच्या प्राचार्या शितल बांगर व रोहिणी वाघ यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांचा गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

यशस्वी विद्यार्थ्यांना विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुनंदा धामणे, तसेच रोहिणी वाघ, राजेंद्र पठारे, विजया साबळे, निलेश बांगर आणि सुमेध मेढे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा माजी आ. नरेंद्र घुले पाटील, संस्थेचे सचिव तथा माजी आ. चंद्रशेखर घुले पाटील, अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा राजश्रीताई घुले पाटील, शेवगाव पंचायत समितीचे सभापती डॉ. क्षितिज घुले पाटील, प्रशासकीय अधिकारी कारभारी नजन, संस्था समन्वयक विजय काशीद, प्राचार्या शितल बांगर, मुख्याध्यापिका सुनंदा धामणे आदींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# श्री सिद्धिविनायक सहकारी गृहनिर्माण संस्थेची नूतन कार्यकारिणी जाहीर



३१ वर्षे संस्थेचा कारभार सांभाळणाऱ्या जी. के. पाटील यांचा डॉ. स्वरुपकुमार मगर, डॉ. सोपान गोरे व विजयराव देशपांडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

नगर - नगर शहरातील नामांकित श्री सिद्धिविनायक सहकारी गृहनिर्माण संस्थेची ५९वी वार्षिक सर्वसाधारण सभा २६ जुलै रोजी संस्थेचे चेअरमन जी. के. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या सभेत संस्थेच्या सन २०२६-२७ ते २०३०-३१ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी नूतन संचालक मंडळाची एकमताने निवड करण्यात आली.

या निवडीत ज्ञानदेव शहाणे, संजय उगले, नारायणराव गुंड, प्रमोद देवधर, प्रसाद पवार, गौरव झंवर, मदन जामगांकर, स्वप्नील पारख, लिलाराम खन्ना, जयश्री बागडे व शशिकला भालसिंग यांची सर्वानुमते संचालक म्हणून पाच वर्षांसाठी निवड करण्यात आली. नवनिर्वाचित संचालक मंडळाचे उपस्थित सभासदांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

संस्थेच्या ५९व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मांडण्यात आलेले विविध विषय सभासदांनी चर्चेअंती एकमताने व खेळीमेळीच्या वातावरणात मंजूर केले. संस्थेच्या आगामी वाटचालीसंदर्भातही यावेळी सकारात्मक चर्चा झाली. संस्थेची प्रगती, सभासदांच्या हिताचे उपक्रम तसेच संस्थेचा कारभार अधिक सक्षमपणे पुढे नेण्याबाबत नवनिर्वाचित संचालक मंडळाकडून अपेक्षा व्यक्त करण्यात आल्या.

संस्थेचे मावळते चेअरमन जी. के. पाटील यांनी तब्बल ३१ वर्षे संस्थेचा कारभार समर्थपणे सांभाळत संस्थेला नावारूपाला आणण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या कार्यकाळात संस्थेचा कारभार शिस्तबद्ध, पारदर्शक व चोखपणे हाताळण्यात आला. संस्थेच्या विकासासाठी त्यांनी दिलेल्या प्रदीर्घ योगदानाबद्दल सभासदांच्या वतीने त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

डॉ. स्वरुपकुमार मगर, डॉ. सोपान गोरे व विजयराव देशपांडे यांच्या हस्ते जी. के. पाटील यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.

तसेच नवनिर्वाचित संचालक मंडळातील सर्व सदस्यांचा गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. सभेच्या शेवटी ज्ञानदेव शहाणे यांनी आभार मानले.

# तंत्रज्ञानावर श्वान ठरले वरचढ



'कायद्याचे हात लांब असतात', ही म्हण आपण अनेकदा ऐकली आहे; मात्र मानवाने तयार केलेले आधुनिक कॅमेरे आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान अपयशी ठरते, तेव्हा निसर्गाने दिलेली हुंगण्याची अद्भुत क्षमता कशी एखाद्या गुन्हेगारापर्यंत पोहोचवते, याचे जिवंत उदाहरण उत्तर प्रदेशातील संभळ जिल्ह्यात पाहायला मिळाले.

बबराला परिसरात एका सहा वर्षांच्या चिमुरडीवर झालेल्या गंभीर लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणात पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे राहिले होते. पीडित मुलगी प्रचंड धक्क्यात असल्याने आरोपीबाबत कोणतीही माहिती देण्याच्या स्थितीत नव्हती. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरेही बंद होते. त्यामुळे तपासासाठी पोलिसांकडे कोणताही ठोस मार्ग उरला नव्हता. अशा परिस्थितीत संभळ पोलिसांच्या श्वान पथकातील सात वर्षांची लॅब्राडॉर श्वान 'मेरी' हिने आपल्या अचूक वास घेण्याच्या क्षमतेच्या जोरावर तपासाला निर्णायक दिशा दिली. या मूक रक्षकाने आरोपीपर्यंत पोहोचण्याचा मार्ग दाखवला आणि अखेर पोलिसांना यश मिळाले.

बबराला परिसरात घडलेल्या या घटनेनंतर पोलीस आणि न्यायवैद्यक पथक घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळावरून काही नमुने गोळा करण्यात आले; मात्र आरोपीपर्यंत पोहोचण्यासाठी आवश्यक पुरावे मिळत नव्हते. परिसरातील एकही सीसीटीव्ही कॅमेरा सुरू नव्हता. तसेच या घटनेचा प्रत्यक्ष साक्षीदारही उपलब्ध नव्हता. त्यामुळे आरोपीचा शोध घेणे पोलिसांसमोर मोठे आव्हान बनले होते. त्यानंतर संभळ पोलिसांच्या श्वान पथकाला घटनास्थळी बोलावण्यात आले. या पथकातील मेरीने तपासाची संपूर्ण दिशा बदलली.

तपासादरम्यान घटनास्थळावर पोलिसांना एक उपरणे (गमछा) सापडले. हे उपरणे आरोपीचे असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. पोलिसांनी ते मेरीला हुंगण्यासाठी दिले. उपरण्याचा वास घेताच मेरीने तातडीने हालचाल सुरू केली. तिने त्या वासाचा माग काढत बबराला परिसरातील अरुंद रस्त्यांमधून धाव घेतली. पोलिसांचे पथक तिच्या मागे होते. काही अंतर चालल्यानंतर मेरी एका घरासमोर जाऊन थांबली आणि जोरात भुंकू लागली. हे घर बबराला येथील रहिवासी संदीप याचे होते. मेरीच्या अचूक संकेतामुळे पोलिसांना संशयित आरोपीपर्यंत पोहोचण्याचा महत्त्वाचा धागा मिळाला. मेरीच्या संकेतांनंतर पोलिसांनी संदीपची माहिती गोळा केली आणि त्याला पकडण्यासाठी कारवाई सुरू केली. पोलिसांनी त्याला पकडण्याचा प्रयत्न केला असता, संदीपने पोलिसांच्या पथकावर गोळीबार केला आणि पळून जाण्याचा प्रयत्न केला. या गोळीबारात एक पोलिस कर्मचारी जखमी झाला. पोलिसांनी स्वसंरक्षणासाठी प्रत्युत्तर दिले. या वेळी पोलिसांची गोळी संदीपच्या पायाला लागली आणि तो जखमी झाला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. या प्रकरणात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या मेरीचे संभळचे पोलिस अधीक्षक कृष्ण कुमार बिश्नोई यांनी कौतुक केले. त्यांनी मेरीला १० हजार रुपयांचे बक्षीस आणि तिच्या आवडीचे खाद्यपदार्थ देण्याची घोषणा केली.

मेरी ही प्रशिक्षित श्वान असून, प्रशिक्षणादरम्यान तिने उत्कृष्ट कामगिरी केली आहे. वर्ष २०१९ पासून ती संभळ जिल्ह्यात पोलिसांच्या सेवेत आहे. यापूर्वीही तिने अनेक गंभीर गुन्ह्यांच्या तपासात पोलिसांना मदत केली आहे. या घटनेने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे, की अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातही प्रशिक्षित श्वानांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

# कॅलिडोस्कोप

## मॅगीतून २१ हजारांची कमाई!



घरांपासून ते अगदी डोंगराळ भागांपर्यंत सर्वत्र मॅगीची प्रचंड क्रेझ आहे. मॅगी हा पदार्थ लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच आवडतो. विशेषतः थंड हवेच्या ठिकाणी किंवा डोंगराळ भागात फिरायला गेले, की गरमागरम मॅगीची चव घेण्याचा मोह अनेकांना आवरत नाही. या मॅगीच्या स्टॉलमधून एका दिवसात किती कमाई होऊ शकते, याचा अंदाज तुम्ही लावू शकता का? इन्स्टाग्रामवरील एका पेजवरून कंटेंट क्रिएटर बादल ठाकूर यांनी एक व्हिडीओ शेअर केला आहे. डोंगराळ भागात एक दिवस मॅगी विकून किती कमाई होऊ शकते, हे जाणून घेण्यासाठी त्यांनी छोटासा प्रयोग केला. थंड वातावरणात त्यांनी मॅगी बनवायला सुरुवात करताच पर्यटकांची स्टॉलवर गर्दी झाली. मॅगी खाण्यासाठी लोकांनी रांग लावली. बादल यांनी प्रत्येक प्लेट ७० रुपयांना विकली. दिवसभरात तब्बल ३०० प्लेट्स विकल्या गेल्या. या हिशोबाने एका दिवसात त्यांची २१ हजार रुपयांची उलाढाल झाली; मात्र या रकमेतून साहित्य, वाहतूक, स्टॉल उभारणी आणि इतर खर्च किती झाला, याबाबत कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही.

## आशियातील श्रीमंत गाव

भारतातल्या एका गावातील बहुतेक लोकसंख्या अनिवासी भारतीय आहे. हे गाव आशियातील सर्वात श्रीमंत गाव आहे. टुमदार घरे, डोंगर अन् विकसित असे हे गाव असून तिथे १७ बँका, शॉपिंग मॉल आणि थिएटरदेखील आहे. देशातील श्रीमंत गावांच्या यादीत हे गाव अव्वलस्थानी आहे. या ठिकाणचे लोक आजही शेती करतात, पण या लोकांची बँकातील रक्कम ऐकून आवाक होण्याची वेळ येते. लोक परदेशातून पैसे कमवून गावातील बँकांमध्ये ट्रान्स्फर करतात. गुजरातमधील भूजमधील माधापूर या छोट्याशा गावाची ही एक वेगळी ओळख आहे. आशियातील सर्वात श्रीमंत गाव म्हणून या गावाची ओळख निर्माण झाली आहे. फक्त ३२ हजार लोकसंख्या असलेल्या या गावातील लोकांकडे सात हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या मुदत ठेवी आहेत. हा एक विक्रम आहे. भारत सरकारनेही तो मान्य केला आहे.

६५ टक्के लोक एनआरआय

एकूण लोकसंख्येच्या ६५ टक्के एनआरआय लोकसंख्येमुळे माधापूर इतके समृद्ध आहे. हे एनआरआय प्रामुख्याने आफ्रिका, अमेरिका, ब्रिटन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमध्ये आहेत. माधापूरमधील बँक खात्यात जमा झालेले पैसे वाया जात नाहीत. त्यामुळे गाव विकासाचे एक मॉडेल बनले आहे. या पैशाने चांगले रस्ते, तलाव, शाळा, महाविद्यालये, आरोग्य केंद्रे आणि मंदिरे बांधण्यास मदत झाली आहे. या गावात एचडीएफसी, स्टेट बँक, पंजाब नॅशनल बँक, ॲक्सिस, आयसीआयसीआय, युनियन बँक आणि प्रमुख खासगी बँका मिळून तब्बल १७ बँका आहेत.



## राजस्थानात विधवांचे गाव!





राजस्थानमधील एक गाव 'विधवांचे गाव' म्हणून ओळखले जाते. या गावाची गोष्ट फारच दुःखद आहे. राजस्थानमधील अनेक गावे सौंदर्यासाठी प्रसिद्ध आहेत, पण याच राज्यात बुंदू हे ठिकाण रकीबपासून ८५ किलोमीटर अंतरावर असलेल्या हदौती या भागात आहे. तिथे पुरुषांचा तारुण्यातच मृत्यू होतो. ४,५०० लोकसंख्या असलेले बुधपुरा हे बरार प्रदेशाचा भाग असल्याचे म्हटले जाते. त्या ठिकाणी अनेक खाणी आहेत आणि तिथले लोक या खाणींमध्ये काम करतात. याशिवाय तिथे बाहेरूनही लोक कामाच्या शोधात येतात आणि येथे स्थायिक होतात.

खाणकामामुळे लोकांना टीबी

सततच्या कामामुळे आणि दररोज उडणाऱ्या बारीक धुळीमुळे लोकांना टीबी होतो आणि तोही अशा प्रकारे, की ते थेट मृत्यूच्या दारात घेऊन जातो. गावात इतर कोणतेही काम नसल्याने तिथले पुरुष दगडाच्या खाणीत काम करतात आणि या दरम्यान दगडाची धूळ (सिलिका) हळूहळू त्यांच्या छातीत जमा होते आणि नंतर 'सिलिकोसिस'चे रूप धारण करते. 'सिलिकोसिस' किंवा टीबीमुळे त्यांची प्रकृती बिघडते. आजारी पडल्यावर गरिबीमुळे त्यांना योग्य उपचार मिळू शकत नाहीत आणि ते अगदी लहान वयातच मरण पावतात.

## चाहतीला शाहरूखचे मजेशीर उत्तर



बॉलिवूडचा किंग खानची चर्चा चाहत्यांमध्ये पुन्हा एकदा रंगताना पहायला मिळत आहे. मंगळुरूमधील एका कार्यक्रमात शाहरुखने हजेरी लावली होती. या कार्यक्रमात एका चाहतीने सगळ्यासमोर प्रेम व्यक्त केले. त्यावर शाहरुखने दिलेल्या मजेशीर उत्तराची सध्या सगळीकडे चर्चा रंगताना पाहायला मिळते. शाहरुख खानचा मंगळुरूमध्ये एक खास कार्यक्रम होता. या वेळी तो एका व्यवसायिक कामासाठी आणि चाहत्यांशी संवाद साधण्यासाठी उपस्थित होता. शाहरुखने आयुष्यातील पहिली पाच वर्ष मंगळुरूमध्ये घालवली होती. तो आजोबा इफ्तिखार अहमद यांच्यासोबत मंगळुरूमध्ये राहायचा. त्यामुळे या गावाशी त्याचे खास कनेक्शन आहे. या कार्यक्रमात तिथे उपस्थित असलेल्या एका चाहतीने किंग खानसमोर प्रेम व्यक्त केले. ती म्हणाली, की मी तुझ्यावर माझ्या नवऱ्यापेक्षा जास्त प्रेम करते. यावर शाहरुख सुद्धा हसला. स्मितहास्य करत तो त्या महिलेला म्हणाला. 'ये सब अकेले में बताना चाहिए ना...' त्याचे उत्तर ऐकताच प्रेक्षकांमध्ये जोरदार हशा आणि टाळ्यांचा कडकडाट झाला. शाहरुख पुढे त्या चाहतीला म्हणाला, 'मला माहीत आहे, की तुम्ही भावनेच्या भरात बोलता. मला तुझ्या भावना कळत आहेत. मला खात्री आहे की, ते तुमच्या नवऱ्याला सुद्धा समजेल. मी तुम्हा सर्वांवर प्रेम करतो. मी तुझ्या नवऱ्यावर सुद्धा प्रेम करतो. मी तुझ्या कुटुंबावर सुद्धा प्रेम करतो. खूप खूप धन्यवाद.' असे म्हणत त्याने पुन्हा एकदा प्रेक्षकांची मने जिंकली.

## आशियातील श्रीमंत गाव

भारतातल्या एका गावातील बहुतेक लोकसंख्या अनिवासी भारतीय आहे. हे गाव आशियातील सर्वात श्रीमंत गाव आहे. टुमदार घरे, डोंगर अन् विकसित असे हे गाव असून तिथे १७ बँका, शॉपिंग मॉल आणि थिएटरदेखील आहे. देशातील श्रीमंत गावांच्या यादीत हे गाव अव्वलस्थानी आहे. या ठिकाणचे लोक आजही शेती करतात, पण या लोकांची बँकातील रक्कम ऐकून आवाक होण्याची वेळ येते. लोक परदेशातून पैसे कमवून गावातील बँकांमध्ये ट्रान्स्फर करतात. गुजरातमधील भूजमधील माधापूर या छोट्याशा गावाची ही एक वेगळी ओळख आहे. आशियातील सर्वात श्रीमंत गाव म्हणून या गावाची ओळख निर्माण झाली आहे. फक्त ३२ हजार लोकसंख्या असलेल्या या गावातील लोकांकडे सात हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या मुदत ठेवी आहेत. हा एक विक्रम आहे. भारत सरकारनेही तो मान्य केला आहे.

६५ टक्के लोक एनआरआय एकूण लोकसंख्येच्या ६५ टक्के एनआरआय लोकसंख्येमुळे माधापूर इतके समृद्ध आहे. हे एनआरआय प्रामुख्याने आफ्रिका, अमेरिका, ब्रिटन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमध्ये आहेत. माधापूरमधील बँक खात्यात जमा झालेले पैसे वाया जात नाहीत. त्यामुळे गाव विकासाचे एक मॉडेल बनले आहे. या पैशाने चांगले रस्ते, तलाव, शाळा, महाविद्यालये, आरोग्य केंद्रे आणि मंदिरे बांधण्यास मदत झाली आहे. या गावात एचडीएफसी, स्टेट बँक, पंजाब नॅशनल बँक, ॲक्सिस, आयसीआयसीआय, युनियन बँक आणि प्रमुख खासगी बँका मिळून तब्बल १७ बँका आहेत.



## मिठाईत भरलीए हवा



भारतात तऱ्हेतऱ्हेच्या मिठाया मिळतात. या चविष्ट मिठाया बघितल्यावर कोणाच्याही तोंडाला पाणी सुटल्याशिवाय रहाणार नाही. भारतात मिठाई खाण्याचं प्रमाण जास्त असलं तरी जगभरातच वैविध्यपूर्ण मिष्टान्न तयार केली जातात. काहींचा आकार वेगळा असतो तर काहींचा प्रकार भन्नाट असतो. अशीच एक मिठाई सध्या चर्चेचा विषय ठरते आहे. ब्रिटनमधल्या शेफने जगातली सर्वात हलकी मिठाई तयार केली आहे. विशेष बाब म्हणजे ही मिठाई बनवण्यासाठी शास्त्रज्ञांची मदत घेण्यात आली आहे. या मिठाईचं वजन अवघं एक ग्रॅम आहे. आश्चर्य वाटण्याजोगी बाब म्हणजे या मिठाईच्या ९६ टक्के भागात हवा आहे. म्हणजे या मिठाईत फक्त चार टक्के घन पदार्थ आहेत. ही मिठाई बनवण्यासाठी एअरोजेलचा वापर करण्यात आला आहे. एअरोजेल हा जगातला सर्वात हलका घन पदार्थ आहे. १९३१ मध्ये याचा शोध लावण्यात आला होता. एअरोजेलमध्ये ९५ ते ९९.८ टक्क्यांपर्यंत हवा असते. म्हणूनच हा जगातला सर्वात हलका घन पदार्थ ठरतो. एअरोजेल विविध पदार्थांपासून तयार करता येतं. मात्र ही मिठाई बनवण्यासाठी अंड्याच्या पांढऱ्या भागापासून हायड्रोजेल निर्मिती करण्यात आली. यानंतर हायड्रोजेल कॅल्शियम क्लोराइड आणि पाण्यात बुडवून ठेवण्यात आली. काही काळानंतर ती एका साच्यात घालण्यात आली. ही मिठाई तयार करण्यासाठी बरीच मोठी प्रक्रिया करावी लागली. अखेर सगळ्यांच्या मेहनतीला यश आलं आणि जगातली सर्वात हलकी मिठाई तयार झाली.

## अरवलीच्या जंगलातील भीतीदायक किल्ला!



अरवलीच्या जंगलातील भानगडचा किल्ला अत्यंत सुंदर आणि भयानक आहे. लोक दिवसभरात या किल्ल्यात फिरतात; मात्र संध्याकाळ होताच तिथून काढता पाय घेतात. कारण हा किल्ला अत्यंत भीतीदायक असल्याचे सांगितले जाते. त्यामुळेच सूर्यास्त होताच या किल्ल्याचे दरवाजे बंद केले जातात. जयपूर आणि अलवरच्या दरम्यान सरिस्का नॅशनल पार्कपासून अवघ्या ५० किलोमीटर अंतरावर हा किल्ला आहे. भूताखेतांच्या गोष्टींसाठी हा किल्ला अत्यंत प्रसिद्ध आहे; मात्र तरी पर्यटकांना हा किल्ला नेहमी आकर्षित करत राहिला आहे. या किल्ल्याच्या भोवतीचे सौंदर्य नेहमीच पर्यटकांना खुणावत असते. हा किल्ला १७ व्या शतकातील आहे. राजा मानसिंह पहिले यांनी हा किल्ला बांधला होता. मुघल सम्राट अकबराच्या दरबारातील राजा मानसिंह हे अत्यंत प्रतिष्ठित दरबारी होते. त्यांनी आपला नातू माधोसिंह पहिले यांना राहण्यासाठी हा किल्ला बनवला होता. आजही या किल्ल्याच्या सभोवतालचा परिसर आणि किल्ला अत्यंत चांगल्या अवस्थेत आहे. या किल्ल्याच्या लाहौरी गेट, अजमेरी गेट, फुलबारी गेट आणि दिल्ली गेटमधून आत गेल्यास उंचच उंच पुरातन मंदिरे, जुन्या हवेल्या आणि भव्य महाल तुमचे स्वागत करतात. या वास्तूंची कारागिरी पाहून कोणीही वेडापिसाच होईल. या किल्ल्याच्या अंगणातील भुलभुलैय्यासारख्या गल्ल्यांमधून फिरणे म्हणजे एक गंमतच असते. जुन्या भिंतीवर ऊन सावलीचा चाललेला खेळ मानसिक शांतता देत असतो. एके काळी या किल्ल्यामध्ये किती गजबजाट असेल, या किल्ल्याचे काय वैभव असेल याची कल्पना या निमित्ताने येते.

या रहस्यमयी किल्ल्यात मनाला शांती देणारा एक कोपराही आहे. सोमेश्वर महादेवाचे मंदिर. स्थानिक लोक या देवतेला खूप मानतात. मंदिराचे बारीक नक्षीकाम मनाला मोहवून टाकते आणि मनात शांतता निर्माण करते. या किल्ल्यावरून पाहतानाअद्भुत राजस्थान तुमच्या नजरेत भरून जाते. पावसाळा संपल्यानंतर गेल्यावर तर समोरचे हिरवेगार रान तुम्हाला मोहून टाकल्याशिवाय राहत नाही.

या किल्ल्याला शाप मिळाल्याची अख्यायिका आहे. काळी जादू करणाऱ्या एका तांत्रिकाचा जीव राजकुमारीवर जडला होता. तो तिच्यासाठी वेडापिसा झाला होता. राजकुमारी बाजारात गेली तेव्हा तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढण्यासाठी त्याने तिला प्रेम रस देण्याचा प्रयत्न केला; पण राजकुमारीने तो घेण्यास नकार दिला. तिने नंतर हा प्रेम रस घेतला आणि उंचावरून फेकून दिला. ज्या टेकडीवर तिने हा प्रेम रस फेकला, ती टेकडी रहस्यमयरित्या त्या तांत्रिकाच्या अंगावर कोसळली असे सांगितले जाते. त्यातच त्याचा मृत्यू झाला. मरता मरता या तांत्रिकाने संपूर्ण गावाला शाप दिला. हा किल्ला आणि त्याच्या आसपासच्या वस्त्या कायमसाठी उद्ध्वस्त होतील, असा शाप त्याने दिला. त्यानंतर या गावात चमत्कारीक गोष्टी घडू लागल्या. सूर्यास्त होताच या किल्ल्यात आत्म्यांचा वावर सुरू होतो असे सांगितले जाते.

## 'एआय'च्या मदतीने कोट्यधीश



सध्याच्या डिजिटल युगात एखादा १९ वर्षांचा तरुण 'एआय'च्या जोरावर दरमहा एक कोटी रुपये कमवतो, हे ऐकल्यावर कोणाचाच विश्वास बसणार नाही; पण ही खरी घटना आहे आणि ती आता सर्वत्र व्हायरल होत आहे.

आयुष सिंग नावाच्या या तरुणाने केवळ कठोर परिश्रम आणि हुशारीने असा पराक्रम केला आहे. 'आयआयटी' किंवा कोणत्याही मोठ्या महाविद्यालयाची पदवी नसताना तो आज 'एआय' क्षेत्रात यशस्वी उद्योजक बनला आहे. त्याची कहाणी पाहून अनेक तरुणांना प्रेरणा मिळत आहे. ज्या वयात मुले खेळात आणि अभ्यासात रामलेले असतात, त्या वयात आयुषने 'मशीन लर्निंग' आणि 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' शिकण्यास सुरुवात केली. टाळेबंदीच्या काळात त्याने आपले ज्ञान अधिक वृद्धिंगत करत स्वतःला सिद्ध केले. हळूहळू त्याने या क्षेत्रात प्रावीण्य मिळवले.

आज आयुष स्वतःचे ऑनलाइन प्रशिक्षण कार्यक्रम चालवतो. 'टॉपमट'सारख्या प्लॅटफॉर्मवर तो 'एआय', 'मशीन लर्निंग' आणि नवीन तंत्रज्ञान शिकवतो. इच्छुक विद्यार्थी या कोर्सेससाठी शुल्क भरतात आणि त्यामुळे त्याची कमाई लाखांवरून कोट्यवधींपर्यंत पोहोचली आहे.

आयुष सिंगची कहाणी सिद्ध करते, की मोठी पदवी किंवा मोठ्या ब्रँडशिवायही स्वप्ने पूर्ण करता येतात. फक्त समर्पण आणि सतत शिकण्याची इच्छा हवी. ही कहाणी अनेक तरुणांना 'एआय' क्षेत्राकडे आकर्षित करत आहे आणि नव्या पिढीला स्वतःचा रस्ता स्वतःच बनवा असा संदेश देते.

# आनंदधाम परिसरात समर्पण चातुर्मासला प्रारंभ; प्रत्येकाच्या आयुष्यात गुरूची कृपा होणे आवश्यक

## प्रविणऋषी महाराज यांचे प्रतिपादन

नगर – आचार्यश्रींची गुरूकृपा झाली आणि मी घडत गेलो. प्रवर्तकश्री याचे साक्षी आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मिळालेले ज्ञान क्षणोक्षणी आठवते. त्यामुळे गुरूकृपा प्रत्येकासाठी महत्वाची असते. आयुष्य सुरू होते श्वासपासून. जन्माला आल्यावर श्वास घेण्यासाठी बाळ स्वतः रडते किंवा त्याला रडवले जाते. दुसरे आयुष्य तेव्हा सुरू होते, जेव्हा मनात गुरूकृपेची आस निर्माण होते. गुरूंचे आशीर्वाद ग्रहण करण्याची कला येणे हीच आयुष्याची साधना असते. चातुर्मासाचा आज गुरूपौर्णिमेला प्रारंभ झाला असून बुधवारपासून आयुष्यातील ९ रहस्य या विषयावर प्रवचन होईल, असे उपाध्यायश्री प्रविणऋषी महाराज यांनी सांगितले.


चातुर्मासानिमित्त मार्गदर्शन करताना प्रविणऋषी महाराज.

आनंदधामच्या परिसरात आयोजित समर्पण चातुर्मासचा आषाढी पौर्णिमेला शुभारंभ झाला. यावेळी महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषी महाराज, आलोकऋषी महाराज, तिर्थेशऋषी महाराज यांच्यासह साधूसाध्वीजी तसेच समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी आदी उपस्थित होते.

समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी अहिल्यानगरचे सुपुत्र, मुंबईचे सुप्रसिद्ध उद्योगपती तसेच तिरुपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ बोरा, राखी सौरभ बोरा, प्रमिलाबाई बोरा, पराग बोरा व बोरा परिवार आहे.

कुंदनऋषी महाराज म्हणाले, ज्याने आयुष्यात गुरू केला त्याचा उद्धार होतो. गुरूप्रती समर्पित होणे, नितांत श्रद्धा बाळगणे हे खूप मोठे वरदान आहे. गुरूमंत्र ग्रहण केल्यावर जीवनात यश मिळते. ओबडधोबड दगडाला आकार देऊन मूर्ती घडवण्याची शक्ती गुरूमध्ये असते. आचार्यश्रींसारखे गुरू आम्हाला मिळाले हे आमचे भाग्य आहे. उपाध्यायश्रींच्या सान्निध्यातील समर्पण चातुर्मास आज सुरु झाला आहे. चार महिने प्रत्येकाने आत्मकल्याण साधावे आणि जीवनात सकारात्मक परिवर्तनाचा अनुभव घ्यावा.

चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक बोरा यांनी चातुर्मासाचे नियोजन आणि विविध कार्यक्रमांची माहिती दिली. गुरू पौर्णिमेनिमित्त हजारो भाविकांनी श्रद्धेने गुरूदेवांचे दर्शन घेतले.



## गुरुवाणी ३
## अरिहंतच माझे देव

आयुष्य सुरू होते श्वासपासून. जन्माला आल्यावर श्वास घेण्यासाठी बाळ स्वतः रडते किंवा त्याला रडवले जाते. दुसरे आयुष्य तेव्हा सुरू होते जेव्हा मनात गुरूकृपेची आस निर्माण होते. गुरूंचे आशीर्वाद ग्रहण करण्याची कला येणे हीच आयुष्याची साधना असते. आपण आपले लक्ष्य गाठू शकत नाही याचे कारण आपली जन्मपत्रिका नसते, नशीब नसते. अर्जुन माली वर हत्येचे पाप होते. पण त्यांच्यावर तीर्थंकर भगवान महावीर यांची गुरूकृपा झाली व त्यांचे आयुष्य बदलले. त्यांना मोक्ष प्राप्त झाला. महाभारतात अर्जुनाने मोठे सैन्य नाकारले आणि निशस्त्र श्रीकृष्णाला निवडले. त्याला योग्य फळ मिळाले. आजचा दिवस हेच सांगतो की माझ्यावर 'गुरूकृपा' व्हावी. जगातील सर्वच धर्म व्यवस्थेच्या साक्षीने सांगतो की, ज्याला गुरूप्राप्तीचा ध्यास लागतो त्याला गुरूरूपी अमृत भेटतेच. देवाचे माहिती नाही पण गुरू हा आपल्या शिष्याची आर्त हाक नक्कीच ऐकतो. त्यामुळेच आषाढ पौर्णिमा हा गुरू आराधना आणि त्यांच्या प्रती समर्पणाचा दिवस आहे. चातुर्मास चार महिन्यांचा असतो. आजच निश्चय करा की, या काळात मी रागावणार नाही, कोणाला राग येऊ देणार नाही आणि रागाला पाठबळही देणार नाही असा संकल्प करावा. घरात किंवा कुठेही जिथे राग दिसेल तिथे क्षणभरही थांबू नका. रागाला थाराच देऊ नका, समोरचा लगेच शांत होतो. भगवान महावीरांनी चंडकौशिकच्या रागावर कोणतीच प्रतिक्रिया दिली नाही. चंडकौशिकला पूर्व जन्माचे स्मरण झाले व त्याचा राग शांत झाला. सपोर्ट न दिल्यास कोणाची सत्ता सुद्धा राहत नाही. तसेच रागाला सपोर्ट न दिल्यास रागही फार काळ टिकत नाही. चुकीच्या गोष्टींना अजिबात सपोर्ट देऊ नका. चातुर्मास हा त्यागाचा काळ आहे. आपल्या आयुष्यात कोणत्या चांगल्या गोष्टी कायम राहतील आणि कोणत्या चुकीच्या गोष्टी दूर राहतील यालाच लसीकरण म्हणतात. अशा लसी मुळेच जगातून पोलिओ हद्दपार झाला. तीर्थंकरांनी अशी लस दिली आहे की पापरूपी व्हायरस आला तरी पापाचा ताप येत नाही. ही लस घेण्याचा आजचा दिवस आहे. चार महिने सूर्यास्तानंतर काहीही खाणार नाही. गौतम प्रसादी व घरातील जेवण याशिवाय बाहेरचे काहीच पोटात जाऊ देणार नाही हे निश्चित करा. आताच्या काळात हॉटेल बंद झाले तर हॉस्पिटलची आवश्यकता राहणार नाही. हॉस्पिटलला ताकद हॉटेलमुळे मिळते. आज प्रार्थना करा. गुरूदेव मी जे चांगले काम करणार आहे त्यासाठी परवानगी द्या. अरिहंत मेरे देव है, अरिहंत म्हणजेच तीर्थंकर. जे तीर्थंकर मला मागायला नाही घ्यायला शिकवतात. ते मला भीक मागायला नाही शिकवत तर मला मालक बनवतात. मालक कधी मागत नाही तो देत असतो. मला माझ्या आयुष्याचा मालक बनवणारे अरिहंतच माझे देव आहेत. आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत अरिहंत माझे गुरू, माझे देव आहेत. गुरू पौर्णिमेला जिंकण्याची कला शिका. आयुष्यात हरणे मला अजिबात मंजूर नाही. मला विश्वास आहे मी जिंकणार म्हणजे जिंकणारच. हे तत्वज्ञान आयुष्यात आत्मसात करा.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# श्रीरामपूर नगरपालिकेच्या पत्रकार पुरस्कार निवडीवर संशयाची सावली

### पारदर्शकतेसाठी सोहळा रद्द करून नव्याने प्रक्रिया राबविण्याची मागणी

श्रीरामपूर – ज्येष्ठ संपादक वसंतराव देशमुख यांच्या स्मृतीप्रित्यर्थ श्रीरामपूर नगरपालिकेतर्फे पुन्हा सुरू करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय पत्रकार पुरस्कारावर वादाचे सावट गडद झाले आहे. पुरस्कार सुरू करण्याच्या निर्णयाचे स्वागत होत असले, तरी पुरस्कारार्थी निवडीच्या प्रक्रियेवर गंभीर प्रश्न उपस्थित होत असून, संपूर्ण प्रक्रिया रद्द करून नव्याने पारदर्शक निवड प्रक्रिया राबवावी, अशी मागणी पत्रकार क्षेत्रातून जोर धरू लागली आहे.

वसंतराव देशमुख हे निर्भीड, जनहितवादी आणि मूल्याधिष्ठित पत्रकारितेचे प्रतीक मानले जातात. त्यामुळे त्यांच्या नावाने दिल्या जाणाऱ्या पुरस्कारासाठी निवड करताना स्पष्ट निकष, अनुभवी संपादकांचा सहभाग आणि पत्रकारितेतील ठोस योगदानाचा विचार अपेक्षित होता. मात्र यंदा निवड समितीची रचना, पुरस्कारासाठी वापरलेले निकष, पात्र पत्रकारांची माहिती कशी मागविण्यात आली आणि अंतिम नावे कोणत्या आधारावर निश्चित झाली, याबाबत कोणतीही स्पष्टता नसल्याने पुरस्काराच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पूर्वी या पुरस्कारासाठी जिल्ह्यातील प्रमुख वृत्तपत्रांच्या संपादकांशी चर्चा करून पत्रकारांच्या जनहिताच्या कामाचा, धाडसी वृत्तांकनाचा आणि सामाजिक बांधिलकीचा विचार केला जात होता. यंदा अशी प्रक्रिया झाली का, याबाबतच संभ्रम असून, जलजीवन मिशन, पाणीटंचाई, रस्ते, गुन्हेगारी, अमली पदार्थ, शिक्षण आणि प्रशासनातील अनियमितता यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सातत्याने काम करणाऱ्या पत्रकारांचा विचार झाला का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. या वादात आणखी भर म्हणजे, अनेक वर्षांपासून अस्तित्वात नसलेल्या श्रीरामपूर प्रेस क्लबचा संयोजन समितीत समावेश करण्यात आल्याची चर्चा आहे. त्यामुळे शहरातील दोन पत्रकार संघटनांना समितीत स्थान देण्याची वेळ पालिकेवर आल्याने या प्रक्रियेवरही नाराजी व्यक्त होत आहे.


प्रेमदान चौकामधील वेदांतनगरमधील दत्त देवस्थानमध्ये रामकृष्ण क्षीरसागर महाराजांच्या दर्शनासाठी झालेली गर्दी.

# वेदांतनगरमधील श्री दत्त देवस्थानमध्ये गुरूपौर्णिमेस भाविकांची गर्दी

नगर – येथील प्रेमदान चौकामधील वेदांतनगरमधील श्री दत्त देवस्थानमध्ये रामकृष्ण क्षीरसागर महाराजांच्या दर्शनासाठी गुरूपौर्णिमेस भाविकांनी अलोट गर्दी केली होती. भारतभरासह अमेरिका येथून आलेल्या गुरूबंधू-भगिनींनी गुरूदेवांचे दर्शन घेत श्री दत्तक्षेत्रमधील श्री सद्‌गुरू अधिष्ठान मंडपात गुरूचरणी लीन होण्यातील धन्यता अनुभवली.

गुरूपौर्णिमा उत्सवाच्या पूर्वसंध्येला देवस्थानमधील श्री महालक्ष्मी मंडपात कायम विश्वस्त मिलिंद क्षीरसागर यांच्या हस्ते पाठशाळेतील सर्व विद्यार्थ्यांना नवीन वस्त्रांची भेट देण्यात आली. श्री दत्तक्षेत्रमधील श्री दत्तात्रेय निवास, भगवान श्री दत्तात्रेय मंदिर, गुरूदेवांचे अधिष्ठान आणि तपोवन रोडवरील गुरूदेवांचे स्मृतीमंदिर विविध फुलांनी आकर्षकरित्या सजविले होते. केळीचे खुंट, तोरणे आणि रंगीत सुरेख रांगोळ्या भाविकांचे लक्ष वेधून घेत होत्या.

श्री दत्त क्षेत्रमधील भगवान श्री दत्तात्रेय मंदिराचे गर्भगृहात लघुविष्णू अभिषेक सोहळा संपन्न झाला. पहाटे ५ वाजता अभिषेक सोहळ्याचा शुभारंभ करण्यात आला. सकाळी ८ वाजता मंदिराच्या गर्भगृहात व्यासपूजा करण्यात आली. सकाळी ९ वाजता वेदांत विद्यापीठमधील विद्यार्थ्यांनी पाठशाळेतील अध्यापकांचे गुरूपूजन केले. यावेळी वेदान्त विद्यापीठाच्या वेद विभागाचे प्रधान अध्यापक वेदमूर्ती समीहन कोल्हटकर, ऋग्वेद विभागातील अध्यापक वेदमूर्ती अनंत चानसीकर, वेदमूर्ती भानुदास जोशी, वेदमूर्ती निलेश जोशी, अथर्ववेद विभागातील अध्यापक वेदमूर्ती गजानन कुलकर्णी, सामवेद विभागातील अध्यापक वेदमूर्ती शिवानंद माळेगांवकर, शुक्ल यजुर्वेद विभागातील अध्यापक वेदमूर्ती योगानंद माळेगावकर, कृष्ण यजुर्वेदाचे अध्यापक वेदमूर्ती अजिंक्य दीक्षित हे उपस्थित होते. दुपारी १२ वाजता सामुदायिक महाआरती होवून उपस्थित भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

दुपारी ३.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत श्री महालक्ष्मी मंडपात श्रीगुरूदेवांची पाद्यपूजा गुरूदेवांचे घराण्यातील महेंद्र क्षीरसागर, कोथरूड सत्संग अध्यक्षआशिष बेडेकर, पिंपरी-चिंचवड सत्संग अध्यक्ष मंदार भावे यांच्या हस्ते भक्तीपूर्ण वातावरणात संपन्न झाली. या सोहळ्यामध्ये २५ सत्संग मंडळांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. पाद्यपूजा झाल्यावर गुरूदेवांनी दिलेल्या दृकश्राव्य आशीर्वाद श्रवणाचा लाभ सर्वांनी घेतला. पसायदानाने पाद्यपूजा सोहळ्याची सांगता करण्यात आली. उत्सव समितीचे अध्यक्ष आर. जे. जाधव यांनी या भावपूर्ण सोहळ्याचे सूत्रसंचालन केले. श्री दत्तात्रेय निवास, भगवान श्रीदत्तात्रेय मंदिर आणि स्मृतीमंदिर या स्थळी भाविकांनी अत्यंत शिस्तबध्दरितीने रांगा लावून शांतपणे दर्शनाचा आनंद घेतला.

देवस्थानचे कायम विश्वस्त मिलिंद क्षीरसागर, उत्सव समिती अध्यक्ष आर. जे. जाधव, समितीचे सदस्य गणेश पंडित, नैनेश पाटणकर, दिपक कानडे, संजय सोनार, दिलीप बोडके, वसंत पाटील, प्रसाद पुराणिक, शैलेश काळे, ऋषिकेश हिरवे, दिगंबर धारूरकर आदींनी गुरूपौर्णिमा सोहळ्यासाठी परिश्रम घेतले.

# श्री विशाल गणेश मंदिरात गुरुपौर्णिमेनिमित्त गुरुवर्य गेंडानाथ महाराजांच्या प्रतिमेचे पूजन

### भाविकांची मोठी गर्दी; आकर्षक पुष्प सजावट अन् महाप्रसादाचे वाटप

नगर – शहराचे ग्रामदैवत असलेल्या श्री विशाल गणेश मंदिरात गुरुपौर्णिमेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त गुरुवर्य गेंडानाथ महाराज यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करून त्यांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी मंदिराचे महंत संगमनाथ महाराज, आदित्यनाथ महाराज, मस्तनाथ महाराज, सोहमनाथ महाराज, मंगलनाथ महाराज यांच्यासह मंदिरातील सेवेकरी, भाविक उपस्थित होते.


गुरुपौर्णिमेनिमित्त गेंडानाथ महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी महंत संगमनाथ महाराज, आदित्यनाथ महाराज, मस्तनाथ महाराज, सोहमनाथ महाराज, मंगलनाथ महाराज उपस्थित होते.

गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त श्री विशाल गणेश मंदिर परिसराला आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. रंगीबेरंगी फुलांनी सजलेले मंदिर भाविकांचे लक्ष वेधून घेत होते. सकाळपासूनच मंदिरात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. गुरुपौर्णिमा हा गुरु-शिष्य परंपरेचा गौरव करणारा दिवस असून, भारतीय संस्कृतीत या दिवसाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. जीवनाला योग्य दिशा देणाऱ्या गुरुंचे स्मरण, पूजन आणि त्यांच्या विचारांचे आचरण करण्याचा संदेश या निमित्ताने देण्यात आला. गुरुवर्य गेंडानाथ महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करताना उपस्थित भाविकांनी त्यांच्या कार्याचे व आध्यात्मिक विचारांचे स्मरण केले.

महंत संगमनाथ महाराज म्हणाले, गुरुपौर्णिमा हा केवळ गुरुंच्या पूजनाचा दिवस नसून गुरुंनी दिलेल्या विचारांचे चिंतन आणि ते जीवनात आचरणात आणण्याचा दिवस आहे. भारतीय संस्कृतीमध्ये गुरुचे स्थान अत्यंत श्रेष्ठ मानले गेले आहे. आई-वडिलांनंतर जीवनाला योग्य दिशा देण्याचे आणि अज्ञानातून ज्ञानाकडे नेण्याचे कार्य गुरु करीत असतात. गुरुवर्य गेंडानाथ महाराज यांनी अध्यात्म, भक्ती आणि सदाचाराचा मार्ग दाखवून अनेकांना प्रेरणा दिली. त्यांच्या विचारांचे स्मरण करून समाजामध्ये प्रेम, बंधुभाव, सेवा आणि संस्कार रुजविणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. ते पुढे म्हणाले की, आजच्या धावपळीच्या आणि बदलत्या जीवनशैलीत माणसाने अध्यात्माबरोबरच संस्कारांचीही कास धरली पाहिजे. मंदिरात येऊन केवळ देवाचे दर्शन घेणे महत्त्वाचे नाही, तर देवाने आणि गुरुंनी दाखविलेल्या मार्गावर चालणे अधिक महत्त्वाचे आहे. समाजातील प्रत्येक घटकाने एकमेकांना मदत करावी, गरजूंच्या सेवेसाठी पुढे यावे आणि आपल्या पुढील पिढीला संस्कारांची शिदोरी द्यावी. गुरुंचे आशीर्वाद आणि मार्गदर्शन घेऊन समाजहिताचे कार्य करण्याचा संकल्प प्रत्येकाने करावा, असे आवाहन महंत संगमनाथ महाराज यांनी केले.

गुरुपौर्णिमेनिमित्त मंदिरात दिवसभर भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. असंख्य भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने झालेल्या या धार्मिक सोहळ्यामुळे श्री विशाल गणेश मंदिर परिसराला भक्ती आणि श्रद्धेचे स्वरूप प्राप्त झाले होते.


अमरधाम येथे वृक्षारोपण करताना वसंत लोढा, सचिव बाळासाहेब भुजबळ, कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल, किशोर गांधी, महावीर कांकरिया, विलास नंदी आदी.

# पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान, अनुलोमकडून अमरधामात वृक्षारोपण

नगर – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिनानिमित्त पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्ट व अनुलोम संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने नालेगाव येथील अमरधाम येथे विविध वृक्षांची लागवड करण्यात आली.

नालेगाव येथील अमरधाम येथे पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्ट व अनुलोम संस्थेच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिनानिमित्त विलास नंदी यांच्या संकल्पनेतून व पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यामध्ये कडूलिंब, करंजी, वड, जांभूळ, आवळा, सोनचाफा, बहावा या देववृक्षांचे रोपण करण्यात आले. पावसाळ्यात वृक्षारोपण केल्याने रोपे रुजतात. यासाठी पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करावे, असे आवाहन पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे संस्थापक तथा भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते वसंत लोढा यांनी केले आहे. किशोर गांधी म्हणाले, अमरधाम हे शहराच्या मध्यवस्तीत असल्याने येथे वृक्षारोपण केल्यास शहरातील प्रदूषण कमी होईल. तसेच शहरातील पर्यावरण चांगले होऊन स्वच्छ हवा मिळेल.

याप्रसंगी पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्टचे संस्थापक वसंत लोढा, सचिव बाळासाहेब भुजबळ, कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल, किशोर गांधी, महावीर कांकरिया, विलास नंदी, निलेश चिपाडे, उदय अनुभुले, सोमनाथ कुन्हे, अनुलोम संस्थेचे अमोल अवस्थी, हरियालीचे सुरेश खामकर आदी उपस्थित होते. बाळासाहेब भुजबळ यांनी आभार मानले.

# ८ ऑगस्टपासून देशभरात जंतर-मंतर क्रांतीचा एल्गार

नगर – भारतीय संसदीय लोकशाहीला व्यक्तिपूजा, घराणेशाही, जातीय समीकरणे, धार्मिक ध्रुवीकरण, भ्रष्टाचार, धनशक्ती आणि जनविरोधी नोकरशाहीच्या विळख्यातून मुक्त करून संविधानाधिष्ठित, उत्तरदायी आणि जनकेंद्रित लोकशाही व्यवस्था निर्माण करण्याच्या उद्देशाने येत्या ८ ऑगस्ट २०२६ पासून देशभर जंतर-मंतर क्रांतीदिन या नावाने व्यापक जनजागृती आंदोलन सुरू करण्यात येणार आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये लोकशाहीविषयी जागरूकता निर्माण करून शासन आणि निवडणूक व्यवस्थेत मूलभूत परिवर्तन घडवून आणण्याचा संकल्प करण्यात आला असल्याची माहिती पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेचे संस्थापक अ‍ॅड. कारभारी गवळी व अशोक सब्बन यांनी दिली.

या आंदोलनाचा मुख्य उद्देश भारतीय लोकशाहीला लोकभक्ती, ज्ञानभक्ती आणि कर्मभक्ती या त्रिसूत्रीवर उभे करणे हा असून, सत्तेचे केंद्र नागरिक असावेत, लोकप्रतिनिधी व नोकरशाही जनतेसमोर उत्तरदायी असावी आणि शासनाची प्रत्येक कृती संविधानाच्या चौकटीत राहून लोकहितासाठी व्हावी, अशी भूमिका आंदोलनातून मांडण्यात आली आहे.

आंदोलनाच्या घोषणेनुसार भारतीय राष्ट्रध्वजाचे घटनात्मक स्वरूप कायम ठेवत तिरंग्यातील तीन रंगांना नव्या लोकशाही मूल्यांचे प्रतीकात्मक स्वरूप देण्यात आले आहे. प्रत्येक शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था आणि लोकप्रतिनिधींचा नियमित सार्वजनिक लोकलेखाजोखा घेण्याची व्यवस्था निर्माण करण्याची मागणीही आंदोलनातून करण्यात आली आहे. लोकशाही म्हणजे केवळ पाच वर्षांतून एकदा मतदान करून शांत बसणे नसून, लोकप्रतिनिधींना प्रश्न विचारणे, नोकरशाहीवर लोकनियंत्रण ठेवणे, सार्वजनिक निधीचा हिशेब मागणे आणि निष्क्रिय सत्तेला मतपेटीतून नाकारण्याचा अधिकार व जबाबदारी प्रत्येक नागरिकाची आहे, असेही संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

८ ऑगस्टपासून देशातील गावे, शहरे, विद्यापीठे, शेतकरी संघटना, कामगार वस्त्या आणि युवक मंचांमध्ये लोकशाही जनजागृती अभियान राबविण्यात येणार आहे. विविध सभा, चर्चासत्रे, जनसंवाद, संविधान वाचन आणि नागरिकांशी थेट संवादाच्या माध्यमातून या आंदोलनाचा विस्तार करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. तसेच माझा तिरंगा लोकभक्ती, ज्ञानभक्ती, कर्मभक्ती; माझे अशोकचक्र भारतीय संविधान हा महामंत्र देशव्यापी लोकशाही परिवर्तनाचा संदेश ठरेल, असा विश्वास व्यक्त करत अ‍ॅड. कारभारी गवळी यांनी नागरिकांना या जनआंदोलनात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. या आंदोलनासाठी प्रकाश थोरात, अ‍ॅड. अमित थोरात, शाहीर कान्हू सुंबे, अ‍ॅड. लक्ष्मणराव पोकळे, वीरबहादूर प्रजापती, संतोष खामकर, ओम कदम, पोपट शेळके, धनंजय मडके, कैलास पठारे, अ‍ॅड. विद्या शिंदे, राजेंद्र कर्डिले, दिलीप घुले, प्रकाश गोसावी आदी प्रयत्नशील आहेत.


सरपंच चषक फुटबॉल स्पर्धेतील स्पर्धेतील विजेता फिरोदिया शिवाजियन्स संघ.

# फिरोदिया शिवाजियन्स संघाने पटकाविला सरपंच चषक

### फुटबॉल स्पर्धेतील सर्व पाच सामने जिंकून मिळवले विजेतेपद

नगर – शहरातील सैनिकनगर येथील गणेश मित्र मंडळ आयोजित सरपंच चषक फुटबॉल स्पर्धेत फिरोदिया शिवाजियन्स एफसीने अंतिम सामन्यात सुमन एफसीचा ३-० असा पराभव करून विजेतेपद पटकावले. भुईकोट किल्ला जवळील मैदानावर रंगलेल्या या स्पर्धेत शहरातील फुटबॉल संघांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता.

लीग कम नॉकआऊट पद्धतीने झालेल्या या स्पर्धेत फिरोदिया शिवाजियन्स एफसीने साखळी फेरीतील तीन्ही सामने जिंकून आपल्या गटात अव्वल स्थान मिळवले. उपांत्य फेरीत सॉकर क्लबचा ४-० असा दणदणीत पराभव करत संघाने अंतिम फेरी गाठली. अंतिम सामन्यात सुमन एफसीवर ३-० असा विजय मिळवत स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.

अंतिम सामन्यात मयूर गोरखा, दर्शन पवार आणि सूरज शर्मा यांनी प्रत्येकी एक गोल करत संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. फिरोदिया शिवाजियन्स एफसीने स्पर्धेतील सर्व पाच सामने जिंकले. विशेष म्हणजे संपूर्ण स्पर्धेत संघाने एकही गोल न स्वीकारता विजेतेपद मिळवले. बक्षीस वितरण सरपंच विजय खोमणे आणि फरताळे यांच्या हस्ते झाले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी सुशील लोट, राकेश घावरी, सचिन वाल्मिकी आणि सनी वाघेला यांनी अथक परिश्रम घेतले. त्यांच्या उत्कृष्ट नियोजन आणि मेहनतीमुळे स्पर्धा अतिशय शिस्तबद्ध व यशस्वीरीत्या पार पडली. या यशाबद्दल फिरोदिया शिवाजियन्स एफसीच्या खेळाडू, प्रशिक्षक आणि पदाधिकाऱ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

